MPLT20 क्षणचित्रे

जिंकलो रेऽऽऽ

विजेतेपद मिळाल्यानंतर 'देवगिरी एम्परर्स'चे मालक असलेले 'म्युरास्पेक'चे व्यवस्थापकीय संचालक गिरीश साठे (डावीकडे) यांनी प्रशिक्षक हेमंत आठल्ये यांना आलिंगन देऊन आनंद साजरा केला. समोर संघाचे दुसरे प्रशिक्षक केदार जोगळेकर.

सातत्यपूर्ण कामगिरीचे फळ

पूना क्लब : कॉटनकिंग एमपीएल स्पर्धेचा मानकरी ठरलेला चेतन सूर्यवंशी याला पारितोषिक देताना 'इंडो बॅटरीज'चे व्यवस्थापकीय संचालक ज्ञानेश लोहकरे.

विजयाचा आनंद द्विगुणित

अंतिम सामन्याचा मानकरी ठरलेल्या सुमीत चव्हाणला पारितोषिक देताना 'डी. वाय. डेव्हलपर्स'चे व्यवस्थापकीय संचालक अमोल येमूल. मध्यभागी कौशिक मराठे.

स्पर्धेचे शिलेदार

सर्वोत्कृष्ट गोलंदाज किशोर भिकाने

सर्वोत्तम फलंदाज निखिल पराडकर

'देवगिरी'ने उंचावला 'एमपीएल'चा करंडक

किशोर भिकाने, चेतन सूर्यवंशीच्या भेदक गोलंदाजीनंतर सुमीत चव्हाणने चढवला कळस

पुणे, ता. ९ : सर्वोत्तम सांघिक कामगिरीला किशोर भिकाने व चेतन सूर्यवंशी यांची अचूक गोलंदाजी व सलामीवीर सुमीत चव्हाणच्या सुरेख फलंदाजीची साथ मिळाल्यामुळे 'म्युरास्पेक'च्या देवगिरी एम्परर्सने तिसऱ्या कॉटनकिंग एमपीएल स्पर्धेचे विजेतेपद मिळविले. देवगिरीने पूना क्लबवर रविवारी झालेल्या अंतिम लढतीत गतवेळच्या उपविजेत्या रायगड रॉयल्स संघाचा सोळा चेंडू व पाच गडी राखून पराभव केला.

काल रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे हा सामना डेक्कन जिमखाना मैदानावरून पूना क्लब मैदानावर खेळविण्याचा निर्णय संयोजकांनी घेतला. प्रथम फलंदाजी करणाऱ्या रायगड रॉयल्सचा डाव १७.५ षटकांत १०९ धावांत आटोपला. किशोर भिकाने याने पुन्हा एकदा अचूक टप्प्यावर गोलंदाजी करताना १२ धावांत चार गडी बाद केले. देवगिरी एम्परर्स संघाने १७.२ षटकांत ५ बाद ११० धावा केल्या. सुमीत चव्हाणने ५० चेंडूंत सात चौकार व दोन षटकारांसह नाबाद ५९धावा केल्या. रायगडकडून संग्राम अतितकर आणि श्रीकांत मुंढे यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले.

आदल्या दिवशी पडलेला मुसळधार पाऊस आणि त्यामुळे खेळपट्टीत झालेला बदल, मैदानाची एकूण अवस्था लक्षात घेऊन देवगिरीचा कर्णधार अमित पाटील याने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा अपेक्षित निर्णय घेतला. स्पर्धेत आतापर्यंत आपल्या फलंदाजीने रायगडने आपल्या संघाची तटबंदी भक्कम ठेवली होती; पण या वेळी ही तटबंदी किशोरच्या गोलंदाजीसमोर कोसळून पडली. पावसाळी हवामानाचा अचूक फायदा घेत त्याने रायगडच्या फलंदाजांना जेरीस आणले. चेतन सूर्यवंशीने त्याला अचूक साथ केली. रायगडने या वेळी नियोजनही बदलले. हर्षद खडीवालेच्या साथीत कर्णधार रोहित मोटवानी ऐवजी सलामीला प्रवीण देशेट्टी खेळायला आला; पण दोघेही जम बसण्यापूर्वीच बाद झाले. त्यानंतर सूर्यवंशीने मोटवानी व निखिल पराडकरला, तर चौधरीने संग्राम अतितकरला बाद करून रायगडच्या तटबंदीला सुरुंग लावला आणि त्यांची अवस्था ७.२ षटकांत ४ बाद ३० अशी झाली. एरवी सुसाट सुटणारी रायगडची फलंदाजी आज निष्प्रभ ठरली. पहिल्या दहा षटकांत त्यांना अर्धशतकही गाठता आले नाही. या वेळी संदीप आडोळेने दोन चौकार व तीन षटकार मारून २० चेंडूंत ३४ धावांची दमदार खेळी करताना श्रीकांत मुंढेच्या साथीत सहाव्या विकेटसाठी २३ चेंडूंत केलेली ४२ धावांच्या भागीदारीमुळे डाव सावरता आला. ही भागीदारी रायगडची फलंदाजी बहरलीच नाही.

'रायगड'ची भक्कम तटबंदी भेदल्यानंतर त्यांच्यावर कुरघोडी करणे देवगिरीच्या शिलेदारांना जड गेले नाही. अर्थात, त्यांचे पाच मोहरे बाद झाले; पण लढवय्या सुमीत चव्हाणने शेवटपर्यंत किल्ला लढवत एमपीएलचे विजेतेपद सर केले. रायगडच्या सुनील पटेल व श्रीकांत मुंढे यांनी अचूक टप्प्यावर गोलंदाजी करताना देवगिरीच्या फलदाजांना अडचणीत आणले होते., १२ षटकांत ५ बाद ५८ अशा नाजूक परिस्थितीतून सुमीतला 'रनर' घेऊन उतरलेल्या मंदार ढुमकेची चांगली साथ मिळाली. त्यांनी सहाव्या विकेटकरिता २८ चेंडूंत केलेली ५२ धावांची नाबाद भागीदारी महत्त्वपूर्ण ठरली. सुमीतने योग्य ठिकाणी फटक्यांमध्ये 'इम्प्रोव्हायझेशन' दाखवून आपली गुणवत्ता स्द्धि केली.

पूना क्लब : तिसऱ्या कॉटनकिंग एमपीएल ट्वेंटी-२० क्रिकेट स्पर्धेत देवगिरीच्या विजयाचा शिल्पकार ठरलेला सुमीत चव्हाण, संग्राम अतितकरच्या गोलंदाजीवर चौकार मारताना.

संक्षिप्त धावफलक

रायगड रॉयल्स : १७.५ षटकांत सर्वबाद १०९ (संदीप आडोळे ३४, श्रीकांत मुंढे १७, रोहित मोटवानी १५, किशोर भिकाने ४-१२, चेतन सूर्यवंशी ३-२३) **पराभूत विरुद्ध देवगिरी एम्परर्स : १७.२ षटकांत ५ बाद ११०** (सुमीत चव्हाण नाबाद ५९, मंदार ढुमके नाबाद २०, संग्राम अतितकर २-२७, श्रीकांत मुंढे २-२८).

MPL MAHARASHTRA PREMIER LEAGUE AN MCA & SAKAL INITIATIVE

"हा विजय आपणा सर्वांचा"

आमच्या टीमला पाठिंबा देणाऱ्या असंख्य हितचिंतकांना मनःपूर्वक धन्यवाद !!

आपला,
श्री. गिरीश साठे

devgiri EMPERORS
Muraspec Distributors India Pvt. Ltd. inspired wall coverings

पूना क्लबनेही अनुभवला एमपीएलचा थरार

पुणे, ता. ९ : तिसऱ्या कॉटनकिंग एमपीएल स्पर्धा संयोजकांची या वेळी परतीच्या मॉन्सूनने चांगलीच परीक्षा बघितली. नवरात्राच्या पहिल्या माळेला म्हणजे घटस्थापनेला या स्पर्धेला सुरवात झाली, पण त्याच दिवशी पावसाने हजेरी लावली. नवरात्राच्या माळेत पहिल्या दिवशी पाऊस पडला की तो नऊही दिवस पडतो, असे नेहमीच म्हटले जाते. त्याचा अनुभव या वेळी चांगलाच आला. स्पर्धेदरम्यान सातत्याने पावसाने हजेरी लावलीच. संयोजकांसाठी ही स्पर्धा खऱ्या अर्थाने परीक्षेची ठरली. पण, डेक्कन जिमखाना आणि पूना क्लबच्या पदाधिकाऱ्यांची त्यांना साथ मिळाली.

त्यानंतरचा रायगड रॉयल्स आणि देवगिरी एम्परर्स या संघांमध्ये विजेतेपदासाठी झालेला थरार पूना क्लबच्या मैदानाने अनुभवला. शिट्ट्या, टाळ्या, ताशांचा आवाज प्रेक्षकांतून उत्स्फूर्तपणे येत होता. त्याच वेळी ड्रेसिंगरूममधून आपल्या खेळाडूंना प्रोत्साहन देताना खेळाडूही उत्साही होते. 'ठीक है...', 'ए शाब्बास...', 'चलता है..', 'पुरा खेलना...', 'सुम्या तुझे लेके आना है...' अशा घोषणायुद्धाने वातावरण भारून गेले होते.

देवगिरीच्या सुमित चव्हाणने विजयी चौकार मारल्यावर तो क्षण आला... खेळाडू, संघाचे पाठीराखे सुमितचे अभिनंदन करण्यासाठी मैदानातच धावून आले. मग, क्षण होता पारितोषिक वितरणाचा. सामन्याचा मानकरी, स्पर्धेचा मानकरी, सर्वोत्कृष्ट क्षेत्ररक्षक, गोलंदाज, फलंदाज अशा वैयक्तिक पारितोषिकांबरोबरच विजेतेपदाचा करंडक देण्यात आला. तसेच स्पर्धा यशस्वी करण्यासाठी अहोरात्र मेहनत घेणारे ग्राउंड्समन, प्रायोजक, पंच, स्कोअरर यांचाही आठवणीने गौरव करण्यात आल्याने पारितोषिक वितरण सोहळाही अविस्मरणीय झाला.

स्पर्धेचे मुख्य प्रायोजक कॉटनकिंगचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौशिक मराठे यांच्या हस्ते विजेत्या संघाला आकर्षक करंडक, सुवर्णपदक आणि रोख सात लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात आले. उपविजेत्या रायगड रॉयल्सला करंडक, रौप्यपदक आणि रोख पाच लाख रुपयांचे पारितोषिक त्यांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले.

महाराष्ट्र क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष अजय शिर्के, सचिव सुधाकर शानभाग, 'सकाळ'चे संचालक (कॉर्पोरेट डेव्हलपमेंट) उदय जाधव, धनपाल शहा, अमोल येमूल, रियाझ बागवान आणि ज्ञानेश लोहकरे, यामाहचे प्रमोद गोखले, कन्हय्यालाल शहा आणि प्रफुल चंदावरकर यांच्या हस्ते विविध पारितोषिके देण्यात आली.

स्पर्धेतील सर्वोत्तम

- » सामन्याचा मानकरी : सुमीत चव्हाण, देवगिरी एम्परर्स
- » स्पर्धेचा मानकरी : चेतन सूर्यवंशी, देवगिरी एम्परर्स
- » गोलंदाज : किशोर भिकाने, देवगिरी एम्परर्स
- » फलंदाज : निखिल पराडकर, रायगड रॉयल्स
- » क्षेत्ररक्षक : सुमीत चव्हाण, देवगिरी एम्परर्स
- » फेअर प्ले : तोरणा टायगर्स

'ब्रेक' महत्त्वाचा : गौरव कपूर

पुणे, ता. ९ : हॅलो... दोस्तों, कैसे हैं आप... असे परिचित हिंदी शब्द प्रेक्षकांच्या कानी पडले आणि तिसऱ्या कॉटनकिंग एमपीएल स्पर्धेच्या अंतिम लढतीसाठी पूना क्लबवर उपस्थित असलेल्या हजारो प्रेक्षकांनी एकसुरात त्याला 'अच्छे हैं... आप कैसे हैं,' असे एकसुरात म्हणत दाद दिली. तो आवाज होता प्रसिद्ध निवेदक गौरव कपूरचा. 'आयपीएल' स्पर्धेच्या निमित्ताने घराघरांत पोचलेला गौरव आज एमपीएलच्या अंतिम लढतीसाठी निवेदक म्हणून उपस्थित होता. या निमित्ताने त्याच्याशी संवाद साधला तेव्हा, त्याने स्पर्धा या होतच असतात, पण खेळाडूंना एखाद्या मोठ्या स्पर्धेच्या निमित्ताने मिळणारा मोठा 'ब्रेक' महत्त्वाचा असतो. तो या स्पर्धेने मिळाला, असे सांगितले.

'एमपीएल'च्या एकूणच वातावरणाने गौरव भारावून गेला होता. या स्पर्धेचा त्याच्यावर खूप मोठ प्रभाव पडला होता. तो म्हणाला, ''या स्पर्धेशी मी याच वर्षी प्रत्यक्षपणे जोडला गेलो असलो, तरी गेल्या वर्षी मुंबईत झालेल्या काही सामन्यांचे थेट प्रक्षेपण निओ स्पोर्टस वाहिनीवरून पाहिल्यापासून एमपीएलबाबत कमालीची उत्सुकता होती. या वेळी खेळाडूंच्या लिलावाच्या माध्यमातून मी या स्पर्धेशी प्रत्यक्ष जोडला गेलो.''

गौरवने या वेळी स्पर्धेच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या तोंडी क्रिकेट स्पर्धेचा आवर्जुन उल्लेख केला. तो म्हणाला, ''ज्याप्रमाणे खेळाडूंमधील गुणवत्ता आपण कानाकोपऱ्यातून शोधून काढतो, तशीच समालोचन करणाऱ्यांना शोधण्याचे काम या स्पर्धेने केले आहे. कारखानीस आणि मृगेंद्र हे दोन्ही समालोचक खूपच चांगले समालोचन करतात. निवेदन अथवा समालोचन करण्याची ज्यांना आवड आहे, त्यांना या अभिनव उप्रकमाने प्रेरणाच मिळेल.''

पूना क्लब : एमपीएल 'तोंडी क्रिकेट'मध्ये विजेता ठरलेल्या मृगेंद्र पाटील यांना प्रसिद्ध 'अँकर' गौरव कपूर यांच्या हस्ते करंडक देण्यात आला. या वेळी 'महाराष्ट्र क्रिकेट संघटने'चे अध्यक्ष अजय शिर्के उपस्थित होते.

India's favourite MRF tyres and the latest in wheel alignment & balancing at MRF T&S



It's finally here! The latest technology to take care of your wheels. Tyre care service you truly deserve. Drive in and find out what it's all about at ATHARVA TYRES - RANJANGAON

ATHARVA TYRES
Rajamudhra Chowk,
Pune- Ahmednagar Road,
M I D C, Ranjangaon,
Dist - Pune - 412 209
Maharashtra
Ph: 02138 - 645955
Mob: 98228 45555
98226 13874
E-mail:atharvatyres5@gmail.com

You can also avail MRF's T&S Services at any of these locations:

AKOLA RUNGTA TYRES Ph: 0724 - 2425736 / 2425737 Mob: 98230 43825
AMARAVATI VIDARBHA TYRES Ph: 0721 - 2551454 Mob: 94228 55480
LONAVALA NANDA TYRES Ph: 0211 - 4271426 Mob: 99605 11194
NAGPUR AGARWAL TYRES Ph: 0712 - 2740570 Mob: 90496 09361
NAGPUR AMBIKA TYRES Ph: 0712 - 6527822 / 6527823 Mob: 98230 64529
NAGPUR ORANGE CITY TYRE HOUSE Ph: 0712 - 6507066 Mob: 98904 40944
NASIK TEJAS TYRES Ph: 0253 - 6453306 Mob: 93703 67640 / 93703 67644
NAVI - MUMBAI GUARDEX TYRE SERVICES Ph: 022 - 27812860 / 27812930 Mob: 98211 44986
PUNE DECCAN TYRES Ph: 020 - 25813224 Mob: 98228 34392
PUNE VISWANATH TYRES Ph: 020 - 66114816 Mob: 93710 19122
PUNE TYRE TRAX Ph: 020 - 65208002 / 27030500 Mob: 98508 80088
SOLAPUR M.P. GANDHI & SONS Ph: 02140 - 263124 Mob: 94226 96035
SOLAPUR B.Y. TYRES Ph: 0217 - 2740173 Mob: 93716 71690
ULHASNAGAR A.M. TYRES Ph: 0251 - 3298542 Mob: 98908 99223

What's unique about MRF T&S
- Entire range of your favourite MRF Tyres
- Computerised wheel alignment
- Computerised wheel balancing
- Automatic tyre changing
- Nitrogen Inflation
- Tubeless tyre repair facility
- Air-conditioned comfort
- MRF Trained Service Personnel

Enquiries for T&S Franchiseeship solicited for various towns. Apply to:
T&S Manager, MRF T&S CENTRE, MRF LIMITED,
124, GREAMS ROAD, CHENNAI - 600 006.
Mobile Nos:096000 31948 / 96000 31964
Visit us at http://www.mrftyres.com

How to Reach